**युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान भारत भेटीवर (08-09 ऑक्टोबर 2025)**

04 ऑक्टोबर 2025

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरुन, युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान आदरणीय सर कीर स्टार्मर हे 8-9 ऑक्टोबर 2025 दरम्यान भारत भेटीवर असतील. ही पंतप्रधान स्टार्मर यांची पहिलीच अधिकृत भारत भेट असेल.

2. या भेटीदरम्यान, 9 ऑक्टोबर रोजी मुंबईमध्ये उभय पंतप्रधान हे 'व्हिजन 2035' नुसार भारत-यूके सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या विविध पैलू बाबतच्या प्रगतीचा आढावा घेतील. व्यापार आणि गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम, संरक्षण आणि सुरक्षा, हवामान आणि ऊर्जा, आरोग्य, शिक्षण आणि नागरिक परस्पर संबंधांच्या प्रमुख मुद्द्यांमध्ये कार्यक्रम आणि उपक्रमांचा केंद्रित आणि विहित वेळेत 10 वर्षाचा असेलला रोडमॅप हा चर्चेच्या केंद्रस्थानी असेल. भविष्यातील भारत-यूके आर्थिक भागीदारीचा मध्यवर्ती आधारस्तंभ म्हणून भारत-यूके व्यापक आर्थिक आणि व्यापार करार (CETA) द्वारे सादर केलेल्या संधींवर उभय नेते व्यवसाय आणि उद्योग धुरीणांशी संवाद साधतील. उभय नेते प्रादेशिक आणि जागतिक महत्वाच्या विषयांवर देखील विचारांचे आदान-प्रदान करतील.

3. पंतप्रधान मोदी आणि पंतप्रधान स्टार्मर मुंबईत होणाऱ्या ग्लोबल फिनटेक फेस्टच्या 6 व्या आवृत्तीला उपस्थित राहतील आणि संबोधित करतील. उभय नेते उद्योग धुरीण, धोरणकर्ते आणि नवोन्मेषकांशी देखील संवाद साधतील.

4. 23–24 जुलै 2025 रोजी पंतप्रधान मोदींच्या युके भेटीनंतर निर्धारित बाबींना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने ही भेट आधारित असेल. भारत आणि युनायटेड किंग्डम यांच्यातील भविष्यकालीन भागीदारी निर्माण करण्याचा सामायिक दृष्टिकोन अधोरेखित करण्याची मौल्यवान संधी याद्वारे उपलब्ध होईल.

**नवी दिल्ली**

04 ऑक्टोबर 2025